आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१२  मार्च २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते महाराष्ट्रासह देशभरातल्या ८५ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या रेल्वे प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी
- देशातल्या जल, जंगल, जमीनीवरचा आदिवासींचा हक्क अबाधित ठेवण्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं भारत जोडो न्याय यात्रेत आश्वासन
- खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कोल्हापूर संघाला सर्वसाधारण विजेतेपद

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मुंबईच्या दुसऱ्या डावात ४१८ धावा /विदर्भाला विजयासाठी आणखी ५२८ धावांची गरज

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज गुजरातमधे अहमदाबाद इथून सुमारे ८५ हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या रेल्वे प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. यावेळी त्यांनी दहा नवीन वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. यात अहमदाबाद- मुंबई सेंट्रल गाडीचा समावेश आहे. मुंबई सेंट्रल इथून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या कार्यक्रमात सहभागी झाले. ही गाडी रविवार वगळता सर्व दिवस धावणार आहे. प्रधानमंत्र्यांनी यावेळी मालवाहतूकीसाठी समर्पित रेल्वेमार्गाच्या दोन खंडांचं उद्घाटनं केलं. यात पश्चिम रेल्वेच्या पालघर जिल्ह्यात येणाऱ्या न्यू घोलवड खंडाचा समावेश आहे. तसंच ५१ गतिशक्ती मल्टीमॉडल कार्गो टर्मिनल्स उद्घाटन त्यांनी केलं.  जालना जिल्ह्यातल्या दरेगाव शिवारात उभारण्यात आलेल्या 'गती शक्ती कार्गो टर्मिनल'चं लोकार्पणही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. यावेळी केंद्रीय रस्ते

वाहतूक मंत्री नितीन गडकरी, आणि रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे उपस्थित होते. प्रधानमंत्र्यांनी दीड हजाराहून जास्त एक स्टेशन एक उत्पादन स्टॉलचं लोकार्पण केलं. यात विरार - डहाणू रेल्वे मार्गावर काही स्थानकांचा आणि वाशिम स्थानकाचा समावेश आहे.

लातूर इथल्या मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचं लोकार्पणही प्रधानमंत्र्यांनी केलं. या रेल्वे कोच फॅक्टरीमध्ये रेल्वे आणि मेट्रो कोच तसंच वंदेभारत रेल्वे गाड्यांची बांधणी होणार आहे.

**<><><><><>**

आदिवासी हे देशाचे खरे मालक असून, देशातल्या जल, जंगल, जमीनीवरचा त्यांचा हक्क अबाधित ठेवणार, असं आश्वासन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिलं आहे. त्यांनी सुरु केलेली भारत जोडो न्याय यात्रा आज महाराष्ट्रात नंदूरबारमधे पोचली. तिथं आयोजित सभेत ते बोलत होते. या देशातल्या जल, जंगल आणि जमीनीवर पहिला हक्क आदिवासींचा आहे, परंतु भारतीय जनता पक्ष आदिवासींना वनवासी म्हणून, हक्कापासून वंचित ठेवत आहे, भाजपा सरकार दलित, आदिवासींची जमीन ताब्यात घेऊन अदानीला देत आहे, असा आरोप त्यांनी केला. मनरेगावर २४ वर्षात जेवढा खर्च केला जातो तेवढ्या रकमेचं म्हणजे तब्बल १६ लाख कोटींचं २२ उद्योगपतींचे कर्ज माफ केलं, पण आदिवासी, गरिबांचा एक रुपयाही माफ केला नाही. आदिवासांचे हक्क हिरावून घेतले जात आहेत. देशात आदिवासींची ८ टक्के लोकसंख्या आहे, पण त्याप्रमाणात सत्तेत भागिदारी नाही. काँग्रेस सत्तेत आल्यानंतर हे चित्र बदलणार आणि ज्यांची जेवढी लोकसंख्या तेवढा हक्क दिला जाईल, असं ते म्हणाले.

युपीए सरकारनं आणलेला जमीन अधिग्रहण कायदा भाजपा सरकारनं कमजोर केला आहे, सत्ता मिळाली तर पुन्हा हा कायदा मजबूत केला जाईल. जातनिहाय जनगणना केली जाईल, शेतमालाला एमएसपीचा कायदा लागू केला जाईल, ज्या भागात आदिवासींची ५० टक्के लोकसंख्या आहे तेथील सर्व निर्णय घेण्याचा अधिकार आदिवासींना दिला जाईल, असं आश्वासन राहुल गांधी यांनी दिलं.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, राज्य प्रभारी रमेश चेन्नीथला, तसंच काँग्रेसचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीत चारशेपेक्षा जास्त जागा मिळवून भाजपाला देशाचं संविधान बदलायचं आहे असा आरोप शिवसेनेच्या ठाकरे गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी केला आहे. यवतमाळ जिल्ह्यात राळेगाव इथं आज ते कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते. यापूर्वीच्या निवडणुकांमधे मोदी यांनी दिलेली आश्वासनं पूर्ण केली नाहीत उलट उद्योगपतींचा फायदा करुन दिला, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

समाजसुधारणेची बीजं सर्वप्रथम महाराष्ट्रात रुजतात आणि पुढे त्यांचा वटवृक्ष होतो, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे देण्यात येणाऱ्या समाज भूषण पुरस्कारांचं आज सकाळी मुंबईत त्यांच्या हस्ते वितरण करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. समाज कल्याण क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या राज्यातल्या व्यक्ती तसच संस्थांना हे पुरस्कार दरवर्षी देण्यात येतात. आजच्या समारंभात गेल्या चार वर्षातले मिळून एकूण ३९४ पुरस्कार वितरित झाले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच इतर

मान्यवर उपस्थित होते. या पुरस्कारांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांची जयंती आज राज्यभरात साजरी होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वर्षा या त्यांच्या शासकीय निवासस्थानी चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला आणि अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सातारा जिल्ह्यात कराड इथं प्रीती संगमावरच्या यशवंतराव चव्हाणांच्या समाधीस्थळी त्यांच्या स्मृतींना अभिवादन केलं.

बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख अभियंता प्रशांत तायशेटे यांनी महापौर दालनातल्या यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीनं त्यांना अभिवादन केलं.

सांगली जिल्ह्यात कडेगाव तालुक्यातल्या देवराष्ट्रे इथं चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रातिमेचं पूजन करून यशवंतरावांच्या जन्म घरी 'यशवंत कवी संमेलनाचं' आयोजन करण्यात आलं होतं. या संमेलनाचं हे दहावं वर्ष आहे.

नाशिक इथं महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातही यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यापीठाच्या कुलगुरु

लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर, प्रभारी कुलसचिव डॉक्टर संदीप कडू यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

<><><><><>

राज्यशासनाच्या क्रीडा आणि युवक संचालनालयातर्फे आयोजित खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कोल्हापूर संघाला सर्वसाधारण विजेतेपद, तर पुणे आणि सातारा संघाला उपविजेतेपद मिळालं आहे.

लातूर जिल्ह्यात उदगीर इथल्या क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत सिमारे ३०० खेळाडू सहभागी झाले होते. ग्रीको रोमन, फ्री स्टाईल आणि महिला गटात कोल्हापूरचा संघ अव्वल ठरला. कोल्हापूरच्या सोनबा गोंगाने या खेळाडूने ४ वैयक्तिक सुवर्णपदकं पटकावली.सुवर्णपदक विजेत्यांना ६० हजार रुपये रौप्यपदक विजेत्यांना ५० हजार रुपये आणि कांस्यपदक विजेत्यांना ३० हजार रुपये रोख पारितोषिकंही देण्यात आली.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईत सुरु असलेल्या अंतिम सामन्यात आज तिसऱ्या दिवशी मुंबईनं दुसऱ्या डावात ४१८ धावा केल्या. पहिल्या डावात मुंबईनं ११९ धावांची आघाडी मिळवली होती. त्यामुळे त्यांच्याकडे एकूण ५४७ धावांची आघाडी झाली. आज दिवसअखेर दुसऱ्या डावात विदर्भानं बिनबाद १० धावा केल्या. आजचा खेळ थांबला तेव्हा अथर्व तायडे ३, आणि ध्रुव्र शौरी ७ धावांवर खेळत होता. विजयासाठी त्यांना आणखी ५२८ धावांची गरज आहे.

मुंबईनं, दुसऱ्या डावात केलेल्या मोठ्या धावसंख्येत मुशीर खानची १३६ धावांची शतकी खेळी, श्रेयस अय्यरच्या तडाखेबंद ९५ धावा, अंजिक्य रहाणेच्या ७३ धावा, आणि शम्स मुलाणीचं नाबाद अर्धशतक मोलाचं ठरलं.

विदर्भातर्फे हर्ष दुबेनं ५ गडी बाद केले. यश ठाकूरनं ३, तर आदित्य ठाकरे आणि अमन मोखाडे यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

<><><><><>

भारताचा सलामीचा फलंदाज यशस्वी जयस्वालला आज आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं फेब्रुवारी २०२४ चा सर्वोत्कृष्ट खेळाडू घोषित केलं आहे. जयस्वाल सध्या चालू असलेल्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला असून, इंग्लंडबरोबरच्या कसोटी मालिकेत त्यानं दोन द्विशतकं झळकावली होती.

<><><><><>

भाजपाचे हरयाणा प्रदेशाध्यक्ष नायबसिंग सैनी, हरयाणाचे नवे मुख्यमंत्री असतील. उद्या संध्याकाळी त्यांचा शपथविधी होणार असल्याचं भाजपा आमदार जे पी दलाल यांनी बातमीदारांना सांगितलं. भाजपाचे हरयाणा प्रभारी बिप्लब देव यांनी समाजमाध्यमांवर सैनी यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांनी आज सकाळी राजीनामा दिल्यानंतर भाजपा विधीमंडळ पक्षाची बैठक झाली. त्यात सैनी यांची एकमतानं निवड झाली. बैठकीनंतर सैनी यांनी हरयाणाच्या राज्यपालांची भेट घेऊन सरकार स्थापनेसाठी दावा केला.

९० सदस्यांच्या हरयाणा विधानसभेत आपल्याकडे ४५ पेक्षा जास्त आमदार असल्याचा दावा भाजपानं केला आहे. भाजपाकडे ४१ आमदार असून, सत्ताधारी आघाडीचा भाग असलेले ६ अपक्ष आमदार भाजपा सरकारला पाठिंबा देऊ शकतात, असं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे.

<><><><><>

'स्वराज- भारत के स्वतंत्रता संग्राम की समग्र गाथा' ही दूरदर्शनवरची मालिका आता ॲमेझॉन प्राईम या ओटीटी प्लॅटफॉर्मवरसुद्धा उपलब्ध होणार आहे. प्रसारभारतीची मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव दिवेदी यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

सरदार वल्लभभाई पटेल, यांच्या जीवनावर आधारित 'सरदार द गेम चेंजर' ही मालिका दूरदर्शनवर प्रसारित केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी, कोकणात आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली आहे.

येत्या दोन दिवसात, राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**